# सार्वजनिक आरोग्य विभाग
## नागरिकांची सनद

भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नागरिकांचे आरोग्य संवर्धन हे आपल्या राज्य शासनाचे कर्तव्य आहे. सर्वसाधारणपणे सामान्य नागरिकास आजार असल्यास त्यास बरे करणे एवढाच मर्यादित दृष्टिकोण सार्वजनिक आरोग्याचा नसून नागरिकांच्या शारीरिक स्थितीबरोबरच त्यांची मानसिक व सामाजिक स्थिति देखील निरोगी व निकोप राहील अशी परिस्थिति निर्माण करणे आवश्यक आहे. जनजीवनाच्या अन्न, पाणी व वस्त्र या मूलभूत गराजांबरोबरच वैद्यकीय सेवाही आजच्या काळात मूलभूत गरजेचा एक भाग बनत चालली आहे. आरोग्य अंनुवंशिकता, बाह्यवातावरण, सामाजिक स्थिति, आर्थिक स्थिति यावर अवलंबून असते. आरोग्य सवर्धनासाठी चांगल्या आहार सवयी, वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता, व्यसनमुक्त राहणीमान इ. गोष्टी आपण होऊन अंगी बाळगणे आवश्यक आहे. राज्यातील तळागाळातील ग्रामीण जनतेला त्रिस्तरीय पद्धतीने आरोग्य सेवा पुरवण्यात येतात. सदर पध्दतीस संदर्भ सेवा समजण्यात येते आणि ग्रामीण रुग्णालयातील उपचारानंतर आवश्यकतेनुसार रुग्णास जिल्हा रुग्णालयाकडे पाठविले जाते.

नंदुरबार जिल्ह्यातील खालील प्रमाणे आरोग्य संस्था कार्यरत आहेत. :

1) आरोग्य उपकेंद्र :-290, 2 ) प्राथमिक आरोग्य केंद्र :- 61, 3) जिल्हा रुग्णालय :- 1, 4) उपजिल्हा रुग्णालय :- 2, 5) ग्रामीण रुग्णालय :-13 6) नागरी आरोग्य केंद्र :- 3

आरोग्य विभागातील दिल्या जाणाऱ्या सेवा :

अ) बाह्य रुग्ण सेवा :- प्राथमिक आरोग्य केंद्रात सकाळी 8.30 ते 1.00 व सायंकाळी 4.00 ते 5.30 या वेळेत दररोज रुग्ण तपासणी उपचार केले जातात तातडीची सेवा 24 तास उपलब्ध असते.

ब) बाह्य रुग्ण नोंदणी फी :- प्रौढ रुग्णास रु.2/- फी आकारली जाते. गरोदर माता,दारिद्रय रेषेखालील रुग्णांना नोंदणी फी नाही.

क) मोफत सुविधा :- सर्व प्रकारच्या रुग्णांचा उपचार सर्प दंशावरील व श्वान चावल्यावरील इंजेक्शन मोफत दिली जातात क्षयरोगांवरील व कृष्ठरोगावरील उपचार,बालकांना रोगप्रतीकरक लसी देणे, गरोदर मातांची तपासणी उपचार व संदर्भ सेवा व पाठपुरावा,कुटुंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत पाळणा लांबवण्याची साधने ,लोहयुक्त गोळ्या,जीवनसातव अ वाटप केले जाते.


प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत वेळोवेळी आयोजित करण्यात येत असलेल्या कुटुंब कल्याण शस्त्र क्रिया व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात लाभार्थीवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात.

सार्वनिक आरोग्य विभाग

## जिल्हा परिषद, नंदुरबार

# नागरीकांची सनद

## संस्थेचा प्रारुप तक्ता



| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभार्थिंचे स्वरूप | लाभार्थी निवडीचे निकष | योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा | सेवा मुदतीत न मिळाल्यास तक्रार करावयाचे अधिका-याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | **मातृत्व अनुदान योजना** | अनुसूचित जमाती तील गरोदर महिलांसाठी रोख रक्कम रु.४०० व औषधी स्वरुपात रु.४०० | आदिवासी कार्यक्षेत्रातील अनुसूचित जमाती तील गरोदर महिलांसाठी तीन जिवंत आपत्यपर्यंत गरोदरपणात आरोग्य संस्थेत नोंद असणे आवश्यक. | उपकेंद्र स्तरावरील कार्यरत आरोग्य सेविका | संबंधित कार्यक्षेत्रातील तालुका आरोग्य अधिकारी<br>गट विकास अधिकारी<br>जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 2 | **राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम** | नसबंदी शास्त्राक्रीया , तांबी, निरोध व गर्भनिरोधक गोळ्या वाटप करणे सेवा देण्यात येतात.<br>पुरुष लाभार्थी : नसबंदी शास्त्राक्रीया करीता लाभार्थ्यास रु.११०० लाभ देण्यात येतो.<br>स्त्री लाभार्थी : BPL/SC/ST लाभार्थी असल्यास रु.६०० व इतर लाभार्थी असल्यास रु. २५० लाभ देण्यात येतो. | शासकीय रुग्णालयात कुटुंब कल्याण शास्त्राक्रीया करून घेणारे लाभार्थी स्त्री/ पुरुष | ज्या आरोग्य संस्थेत कुटुंब कल्याण शास्त्राक्रीया झालेली असेल त्या संस्थेचे वैद्यकीय अधिकारी. | संबंधित कार्यक्षेत्रातील तालुका आरोग्य अधिकारी<br>गट विकास अधिकारी<br>जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 3 | **मानव विकास कार्यक्रम** | **बुडीत मजुरी :** दुसऱ्याबाळंत महिलेला गरोदरपणाच्या ७ व्या महिन्यात रु.२००० व प्रसुती झालेनंतर रु.२००० बुडीत मजुरी पोटी देण्यात येते.<br>**आरोग्य शिबीर :** "गरोदर माता, स्तनदा माता, व ० ते ६ महिने वयोगटातील मुलांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व औषधोपचार करणे | अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती / दारिद्रयरेषे खालील माता | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र | तालुका आरोग्य अधिकारी<br>जिल्हा आरोग्य अधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | **जननी सुरक्षा योजना** | ग्रामीण भागातील पात्र गरोदर माता रुग्णालयात प्रसुती झाल्यास रु.७००/- व शहरी भागातील गरोदर माता रुग्णालयात प्रसुती झाल्यास रु.६००/- व मातांची प्रसुती सिजेरीयन झाल्यास त्या रुग्णालयास मातेच्या सिजेरीयन करीता रु.१५०० अनुदान वितरित करण्यात येते. | BPL/SC/ST कुटुंबातील गरोदर मतांना लाभ देण्यात येतो.<br>या योजनेसाठी आपत्याची अट नाही.<br>प्रसुती शासकीय आरोग्य संस्थेत अथवा मानांकित आरोग्य संस्थेत आवश्यक. | आरोग्य सेविका उपकेंद्र वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र तालुकाआरोग्य अधिकारी |
| 5 | **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम** | गरोदरपनात व प्रसुतीनंतर बाळ एक वर्ष होईपर्यंत माता व बालकांना मोफत औषधोपचार दिले जातात. तसेच त्यांना शासकीय वाहनाव्दारे घरापासून शासकीय संस्थेमध्ये व शासकीय संस्थेपासून घरापर्यंत मोफत संदर्भ सेवा दिल्या जातात. या साठी शासकीय रुग्णवाहीकेसाठी टोल फ्री क्रमांक १०२ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. | सर्व गरोदर मता व बालकांसाठी टोल फ्री क्रमांक :102,<br>आपत्कालीन सेवेसाठी टोल फ्री क्रमांक १०८ | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र आरोग्य सेविका उपकेंद्र | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा शल्य चिकित्सक |
| 6 | **प्रधान मंत्री मातृ वंदन योजना** | प्रथमतः गर्भवती महिला व स्तनदा माता ज्यांची गर्भधारणा दिनांक ०१.०१.२०१७ रोजी अथवा तदनंतर झाली असेल व ज्यांची शासकीय रुग्णालयात नोंदणी केली असेल अशाच पात्र मातांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.पात्र लाभार्थ्यांना सकस आहार व बुडीत रोजगाराची अंशपुर्ती या करीता तीन टप्प्यात रुपये ५०००/- चा व पात्र लाभार्थ्यांना जननी सुरक्षा योजनेच्या अतिरिक्त लाभ बँक खाती वर्ग करण्यात येतो. | सर्व माता ( सर्व स्तरावरील )<br>रु.१०००/- नोंदणी वेळी (गरोदर राहिल्यापासून १५० दिवसाच्या आत )<br>रु.२०००/- माताची प्रसुतीपूर्व एक तपासणी (गरोदर राहिल्यापासून १८० दिवसानंतर )<br>रु.२०००/- बाळाच्या जन्मानंतर ९० दिवसात (बाळाचे तीन महिन्याचे लसीकरण पूर्ण झाल्यावर ) | उपकेंद्र स्तरावर आशा व आरोग्य सेविका मार्फत नोंदणी फोर्म व आवश्यक कागदपत्र जमा करणे आवश्यक | तालुका आरोग्य अधिकारी |
| 7 | **राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम** | २ डॉक्टर, १ आरोग्य सेविका, १ औषध निर्माण अधिकारी असे पथक वाहन व पुरेश्या औषधी साठ्यासह जिल्ह्यातील सर्व प्राथमिक , माध्यमिक व आश्रम शाळा, अंगणवाडी येथील लाभार्थीची आरोग्य तपासणी करण्यात येते. | तपासणी अंती दोषी विद्यार्थ्यांना औषधोपचार करणे व गंभीर आजाराचे लाभार्थींना आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देण्यात येते. | आर.बी.एस.के.पथक | जिल्हा शल्य चिकित्सक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | **मोफत आहार** | शासकीय संस्थेत प्रसुती झाल्यास मातेला तीन दिवस मोफत आहार देण्यात येतो. व सिजेरीयन प्रसुती झाल्यास मातेला सात दिवस मोफत आहार देण्यात येतो. | प्रती माता प्रती दिन रु.१००/- प्रमाणे मोफत आहारावर खर्च केला जातो. | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र<br>आरोग्य सेविका उपकेंद्र | तालुका आरोग्य अधिकारी |
| 9 | **आशा कार्यक्रम** | अशा स्वयंसेविकेमार्फत प्रत्येक गावात आरोग्य सेवा व सुविधा पुरावानेसाठी प्रसार करणे .<br>संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजाराबाबत सल्ला देऊन सेवा देणे साठी संदर्भित करणे<br>सर्व शिशु व माता यांना भेटी देणे व आरोग्य सल्ला देणे.<br>सर्व राष्ट्रीय कार्यक्रमात ,लसीकरण सत्रात मदत करणे. | ग्रामीण भागात प्रत्येक गाव पाड्यात आरोग्य सेवा पुरवणे. | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र<br>गट प्रवर्तक ,प्रा.आ.केंद्र<br>आरोग्य सेविका उपकेंद्र | तालुका आरोग्य अधिकारी<br>तालुका समूह संघटक |

(डॉ. गोविंद पंडित चौधरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार